दिनांक :     .२.२०१९

प्रति,

माननीय केंद्रीय गृहमंत्री,

केंद्र सरकार, नवी देहली ११०००१.

**विषय : देशांतर्गत आतंकवादाचे मूळ असलेले मदरसे आणि आतंकवादी कारवाया करणारी 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' यांवर तत्काळ बंदी घालण्याबाबत....**

महोदय,

प्रजासत्ताकदिनाच्या निमित्ताने देशात घातपाती कारवाया करण्याच्या सिद्धतेत असलेल्या संशयावरून जानेवारी महिन्यात मुंबई आतंकवादविरोधी पथकाने मुंबई आणि संभाजीनगर (औरंगाबाद) येथून ९ जणांना कह्यात घेतले. पथकाने कह्यात घेतलेले सर्वजण १७ ते ३५ वर्ष वयोगटातील आहेत. काही दिवसांपूर्वी उत्तरप्रदेश आणि राजस्थान या राज्यांतही पोलिसांनी अशा प्रकारची कारवाई केली आहे. अटक केलेल्यांपैकी मुख्य आरोपी मदरशांतून ताब्यात घेतला; तर एकाचा संबंध 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' या संघटनेशी आहे, असे लक्षात आले आहे. यातून देशभरात आतंकवादाची पाळेमुळे खोलवर रूजली असल्याचे स्पष्ट दिसून येते. आतंकवादी कारवायांमधील धर्मांध युवकांचा वाढता सहभाग हा राष्ट्राची सुरक्षा आणि अखंडता या दृष्टीने अतिशय चिंतेचा विषय झाला आहे.

शत्रूराष्ट्र पाकिस्तानच्या कारवाया सीमेवर उघडपणे चालू असतांना देशांतर्गत चालू असलेले हे छुपे युद्ध अधिक धोकादायक आहे. केवळ संशयितांना पकडणे, हा वरवरचा उपाय न करता देशामध्ये अशी धर्मांध आणि देशविघातक वृत्ती निर्माण करण्याचे मूळ शोधून त्याचा बंदोबस्त करणे अपरिहार्य आहे. देशातील या वाढत्या आतंकवादी कारवायांचे मूळ जिहादचे शिक्षण देणारे मदरसे आहेत. याकडे भारत सरकारने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. काही दिवसांपूर्वी शिया वक्फ बोर्डाचे अध्यक्ष वसीम रिजवी यांनीच देशातील मदरसांमध्ये आतंकवादाचे शिक्षण दिले जात असल्याचे जाहीरपणे सांगून 'मदरशांवर बंदी घालायला हवी' अशी मागणी त्यांनी पंतप्रधानांकडे एका पत्राद्वारे केली आहे.

पाकिस्तानमधील उदारमतवादी मौलाना जावेद अहमद घामडी यांनी काही दिवसांपूर्वीच मदरशांमध्ये देण्यात येत असलेल्या शिकवणीविषयी अमेरिकेमध्ये मांडलेली सूत्रे मदरशांचे वास्तविक रूप जगापुढे आणणारी आहेत. घामडी म्हणाले, ''जगात कुठे मूर्तीपूजा होत असेल किंवा मुसलमान इस्लाम सोडून जात असेल, तर त्यांना ठार मारण्याचा अधिकार तुम्हाला आहे. जगामध्ये मुसलमान सोडून अन्य धर्मीय केवळ मुसलमानांकडून प्रजा होण्यासाठी निर्माण झाले आहेत. मुसलमान सोडून जगात कुणालाही अधिकार गाजवण्याचा हक्क नाही. तसेच मुसलमान सोडून अन्य धर्मियांची सत्ता ही निरर्थक आहे. मुसलमानांनी अन्य धर्मियांची सत्ता उलथवून टाकावी. जगात केवळ मुसलमानांचीच सत्ता असायला हवी. त्याला 'खिलाफत' असे म्हणतात. लोकतंत्र हे अर्थहीन आहे. त्याला इस्लाममध्ये कोणतेही स्थान नाही. अशी शिकवण मदरशांमधून दिली जाते.'' अशाप्रकारे राष्ट्रविघातक शिकवण घेऊन मदरशांतून बाहेर पडणारे मुसलमान युवक भारताशी कधीतरी एकनिष्ठ राहू शकतील काय? ते भारतीय संविधान अथवा लोकशाही यांना मानतील काय? तसेच मुसलमानेतर जनतेला सुखाने जगू देतील काय ? हे गंभीर प्रश्न उपस्थित होतात.

*** या संदर्भात काही बाबी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो...**

१. भारतीय सेनाध्यक्षांनीही काश्मीरमधील आतंकवाद रोखण्यासाठी मदरशांमध्ये दिल्या जाणाऱ्या शिक्षणावर लक्ष ठेवण्याची सूचना दिली आहे.

२. दिनांक २६ नोव्हेंबर २००८ च्या मुंबईतील आतंकवादी आक्रमणानंतर प्रसिद्ध इस्लामिक लेखक मुजफ्फर हुसेन यांचा १५ फेब्रुवारी २००९ मध्ये हिंदी साप्ताहिक 'पांचजन्य' मध्ये 'देवबंद मदरसा है आतंकवाद का अड्डा' या शीर्षकाखाली लेख प्रसिद्ध झाला होता. त्यामध्ये त्यांनी स्पष्टपणे लिहिले आहे की, भारतीय उपखंडातील मुसलमानांसाठी देवबंद मदरसांमधून निघणारे फतवे इस्लामचा संदेश म्हणून मानले जातात. त्यावर भारत सरकारही निष्क्रीय ठरते. या फतव्यांपुढे संविधान आणि भारतीय दंड संहिता यांचे महत्त्व रहात नाही.

३. मुंबईतील आतंकवादी आक्रमणानंतर संयुक्त राष्ट्र संघामधील पाकिस्तानचे तत्कालीन प्रतिनिधी अब्दुल्ला हुसैन हारून यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, भारत सरकार आमच्यावर आतंकवादाला प्रोत्साहन देत असल्याचा आरोप करतो; मात्र प्रत्यक्षात पाकिस्तानातील आतंकवादाची निर्यात भारतातील जनक देवबंद मदरशांमधून होते.

४. आज पाकिस्तान आतंकवादाने पूर्णत: पोखरला आहे. याचे मूळ तेथील मदरसे असल्याचे वास्तव पाकिस्तानच्या लष्करानेही मान्य केले आहे. यासाठी पाकिस्तानच्या सेनेने तेथील मदरशांवर नियंत्रण ठेवण्याचा सल्ला तेथील सरकारला दिला आहे.

५. आतंकवादाचा स्त्रोत नष्ट व्हावा, यासाठी बांगलादेशमध्ये मदरशांच्या पाठ्यपुस्तकातील जिहादविषयीचे धडे वगळण्यात आले आहेत.

६. दिनांक २ मार्च २०१७ या दिवशी देहली येथील विवेकानंद इंटरनॅशनल फाऊंडेशनच्या एका कार्यक्रमात अमेरिकन संसदेचे प्रभावी सदस्य एड रॉयस यांनी 'पाकिस्तानमध्ये असे ६०० देवबंदी मदरसे आहेत, जे लोकांना भ्रमित करत आहेत. ज्यातून जिहादचे शिक्षण दिले जाते. त्यामुळे 'लष्कर-ए-तोयबा' वर कारवाई करण्याबरोबरच मदरसे बंद करावेत', असे आवाहन पाकिस्तानला केले. आज तीच स्थिती भारताची आहे.

७. वरील एकूण स्थितीवरून भारतातील मदरशांचे आतंकवादाचे शिक्षण देणारे स्वरूप स्पष्ट होते. असे असतांना भारतात मात्र मदरशांचा उपयोग राजकारणासाठी केला जात आहे. जेथे मदरशांवर कारवाई व्हायला हवी, तेथे भारत सरकार मदरशांना आर्थिक साहाय्य देत आहे.

८. अखिलेश यादव मुख्यमंत्री असतांना उत्तर प्रदेशमध्ये सरकारी मान्यता असलेले एकूण ७ सहस्र ५०० मदरसे चालवले जात होते. यांतील ८५० मदरशांना सरकारकडून आर्थिक साहाय्य दिले जात होते. सध्या उत्तर प्रदेशमध्ये असलेल्या योगी सरकारने या मदरशांची माहिती मागवली असता यांतील ४६ मदरशांनी त्यांची माहिती देण्यास नकार दिला. त्यामुळे सरकारने त्यांना दिले जाणारे आर्थिक साहाय्य बंद केले.

९. प्रत्यक्षात मदरशांना सरकारकडून दिले जाणारे आर्थिक साहाय्यच नको आहे; कारण आर्थिक साहाय्य देतांना सरकार मदरशांवर काही अटी घालते. मदरशांना त्या नको असतात. मदरशांमध्ये कुराण, हदीस आणि अरेबियन शिक्षणाच्या व्यक्तीरिक्त अन्य शिक्षण द्यायचे नसते. त्यामुळे मोदी सरकारने मदरशांचे आधुनिकीकरण करण्याची घोषणा केल्यावर इस्लामिक संस्थांनी त्याला विरोध केला; कारण तेथे 'दीन' शिक्षणाच्या नावाखाली कट्टरपंथी देवबंदीचे शिक्षण दिले जात आहे. मदरशांतील अशा प्रकारच्या शिकवणीमुळेच मुल्ला उमर, हाफिज सईद आणि मौलाना अजहर यांसारखे आतंकवादी निर्माण झाले आहेत.

१०. देशभरातील आजवर झालेल्या धार्मिक दंगलींच्या वेळी मशिदी आणि मदरसे यांचा सहभाग दिसून आला आहे. काश्मीरमध्ये प्रती शुक्रवारी नमाजानंतर 'इसिस'चे आणि पाकिस्तानचे झेंडे फडकवले जातात, तर पाकिस्तानच्या समर्थनार्थ घोषणाही दिल्या जातात, सैनिकांवर दगडफेक केली जाते. देशभरात हिंदूंच्या उत्सवांच्या मिरवणुकांवर मशिदी आणि मदरसे यांतून दगडफेक होणे, त्या परिसरातून अशा मिरवणुकांना आणि उत्सवांना बंदी घालणे, दंगली भडकवणे आदी घटना आजवर घडत आल्या आहेत. जोपर्यंत अशा मशिदी आणि मदरसे भारतात अस्तित्वात आहेत, तोपर्यंत भारतात धार्मिक शांतता नांदणे, केवळ अशक्य आहे.

११. नुकत्याच अटक केलेल्या आतंकवाद्यांपैकी एकाचा संबंध ‘पॉप्युलर फ्रन्ट ऑफ इंडिया’ या संघटनेशी आहे, असे तपासात निष्पन्न झाले आहे. ही संघटना यापूर्वी अनेकदा आतंकवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याचे आढळून आली आहे. काही प्रकरणे केवळ उदाहरणासाठी पुढे देत आहे.

अ. ‘पॉप्युलर फ्रन्ट ऑफ इंडिया (पीएफआय)’च्या अबिद पाशा आणि त्याच्या टोळीने म्हैसूरू येथील रा.स्व. संघ अन् भाजप यांच्या ८ हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यांच्या क्रूर हत्या केल्याचे उघड झाले आहे.आ. बेंगळूरू येथील रा.स्व. संघाचे रूद्रेश यांच्या हत्येप्रकरणीही ‘पॉप्युलर फ्रन्ट ऑफ इंडिया’चा हात असल्याचे ‘एन्आयए’ने सांगितले होते.

इ. रा.स्व. संघाचे श्री. हरिश आणि श्री. सतिश या बंधूंवर केलेल्या प्राणघातक आक्रमणात श्री. हरिश यांचा मृत्यू झाला. या प्रकरणांमध्येही याच संघटनेचा सहभाग होता.ई. विघ्नेश अन् सुधींद्र या बंधूंचे अपहरण करून खंडणीची मागणी करत त्यांची हत्या केली. मार्च २०१६ मध्ये भाजपचे के. राजू यांची हत्या यांसारख्या अनेक प्रकरणांत या संघटनेशी संबंधित अबिद पाशा आणि त्याच्या २५ जणांच्या टोळीचा हात होता.

यावरून भारतामध्ये फोफावत असलेल्या आतंकवादाचे भयावह स्वरूप स्पष्ट होते. मदरशांमध्ये दिले जाणारे राष्ट्रविघातक शिक्षण भारताला कधीही एकसंध तर ठेवूच शकत नाही. देशात यापूर्वी घडलेल्या आतंकवादी कारवायांमुळे लक्षावधी देशवासियांना प्राणाला मुकावे लागले आहे. ही भीषणता लक्षात घेऊन मदरशांमधून फोफावत चाललेल्या या आतंकवादाचे दमन वेळीच करायला हवे अन्यथा हा आतंकवाद देशात विध्वंसक परिस्थिती निर्माण केल्याविना रहाणार नाही.

**※ यासाठी आम्ही पुढील मागण्या करत आहोत –**

१. संशयित मदरशांतून आजवर शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांची माहिती गोळा करावी, मदरसे आणि आतंकवादी संघटना यांच्यातील संबंधांची सखोल चौकशी करण्यात यावी, तसेच मदरशांत शिकवणारे शिक्षक अन् संचालक मंडळ या सर्वांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची चौकशी करावी.

२. मदरशांतून देशविरोधी कारवाया केल्या जातात का, याची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारावी.

३. देशातील दहशतवादी कृत्यांत सापडलेले आतंकवादी युवक हे ‘पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया’ या संघटनेशी संबंधित आहेत, तसेच या संघटनेने केलेली कृत्ये पहाता तिच्यावर तत्काळ बंदी घालावी.

आपला विश्वासू,

(संपर्क : )